दक्षतारोध ...

पार करण्यास अनुज्ञा देण्याची प्रकरणे विनाविलंब निकालात काढणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८५/प्रक-२९/१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून १९८५.

## प रि प त्र क

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, दक्षता रोध पार करण्यास अनुज्ञा देण्याच्या प्रकरणी अनेक वेळा विलंब होतो.

२. या विषयी सविस्तर आदेश यापूर्वीच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५-१०, दिनांक २८ ऑक्टोबर, १९७६ रोजी देण्यात आले आहेत. या आदेशानुसार दक्षतारोध पार करण्याची पात्रता अजमावण्याचा निकष सौम्य करण्यात आला आहे, तसेच अनुज्ञा देण्याचे अधिकार विस्तृत प्रमाणात विकेंद्रित करण्यात आले आहेत. अशा प्रकरणी विलंब टाळण्याच्या दृष्टीने अंमलात आणण्याची कार्यपध्दती सुध्दा सदर आदेशानुसार विहित करण्यात आली आहे.

३. सदर परिपत्रकाची प्रत सर्व संबंधितांना माहितीसाठी सोबत जोडली आहे. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्या परिपत्रकातील आदेशाचे यथायोग्य पालन केले जाईल, व अशा प्रकरणी विलंब होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.

४. मंत्रालयाच्या सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख या आदेशाचे पालन करतील अशी दक्षता त्यांनी घ्यावी. या संदर्भात मंत्रालयीन विभागांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक ३० जून, १९८५ पर्यन्त कृपया पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ग. ज. देशमाने,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

[१] राज्यपाल यांचे सचिव,

[कृ. मा. प.]

शामनु-रोटा-साप्रवि-एच-१२८[४,०००-६-८५]

[२] मुख्य मंत्री यांचे सचिव,

[३] प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई [पत्राने],

[४] प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],

[५] प्रबंधक, लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई [पत्राने],

[६] महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

[७] महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

[८] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

[९] विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,

[१०] मंत्रालयाचे सर्व विभाग.

---

एच-१२८[४,०००-६-८५]-अ